पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय
पिंपरी ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध दवाखाना/रुग्णालयांमध्ये करार / कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपाची पदे दरमहा एकत्रित मानधनावर दोन महिने कालावधीकरीता WALK IN INTERVIEW द्वारे भरणेबाबत ...**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत विविध रुग्णालये / दवाखाने / कोवीड केअर सेंटर करीता दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात दोन महिने कालावधीकरिता भरणेकरीता खालील प्रमाणे नमूद संवर्गातील पदे भरणेकामी पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, आरक्षण व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे:

| अ.क्र | पद | शैक्षणिक अर्हता | पद संख्या | मानधन र.रु |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी एम.बी.बी.एस | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील M.B.B.S पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल / सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडीयन मेडिसीन यांचेकडील नोंदणी बंधनकारक.<br>३) Internship झालेनंतर 1 वर्षेकामाचा अनुभव असणे आवश्यक | एकुण ५० पदे | ७५,०००/- |
| २ | वैद्यकिय अधिकारी बी.ए.एम.एस. | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील B.A.M.S पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) सबंधित महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी अद्ययावत प्रमाणपत्र बंधनकारक<br>३) संबधित महाराष्ट्र कौन्सिल कडील कोवीड १९ आयुष नोंदणी बंधनकारक | | ५०,०००/- |
| २ | वैदयकिय अधिकारी कोवीड १९ आयुश प्रमाणपत्रधारक | ४) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील B.H.M.S / B.U.M.S पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>५) सबंधित महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी अद्ययावत प्रमाणपत्र बंधनकारक<br>६) संबधित महाराष्ट्र कौन्सिल कडील कोवीड १९ आयुष नोंदणी बंधनकारक | | ५०,०००/- |

सदयस्थितीत कोवीड १९ विषाणुमुळे बाधीत रुग्णांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे कोवीड १९ चे लसीकरण , कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग , स्वॅब टेस्टिंग , नव्याने सुरु होणारे कोवीड केअर सेंटर , गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहीती घेणेकामी तसेच कोवीड १९ अनुषंगाने झोननिहाय इतर कामकाज करणेकामी उक्त नमुद पदांकरीता दि. १२ -०४-२०२१ पासुन WALK IN INTERVIEW आयोजित करण्यात आलेला असुन इच्छुक उमेदवारांनी सकाळी १०.०० वा. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वैद्यकिय विभाग, २ रा मजला, पिंपरी, पुणे १८, येथे सर्व आवश्यक व अद्ययावत कागदपत्रासह ( मुळप्रत + सत्यप्रत ) उपस्थित रहावे. प्रस्तुत जाहिरातीतील कामकाजासह आदेशातील अटी व शर्ती, मानधन व इतर सर्व बाबी प्रस्तुतच्या पदांना लागू राहतील.

अटि-शर्ती-

१) प्रस्तुतच्या नियुक्त्यामधील पदावरील वैदयकिय अधिका-यांना कोवीड १९ चे लसीकरण , कॉन्ट्रक्ट ट्रेसिंग , स्वॅब टेस्टिंग , नव्याने सुरु होणारे कोवीड केअर सेंटर , गृह विलगीकरण कक्षातील (Home Isolation) रुग्णांची माहीती घेणेकामी तसेच कोवीड १९ अनुषंगाने झोननिहाय इतर कामकाज करणे बंधनकारक राहील.

२) वैदयकिय अधिकारी यांना कोवीड १९ च्या अनुषंगाने महापालिका परिसरामध्ये शासनाचे निर्देशानुसार नागरिकांच्या सर्व्हेक्षणाचे कामकाज करणे बंधनकारक राहिल.

३) प्रस्तुत मानधनावर करावयाच्या नेमणुका ह्या पुर्णता तात्पुरत्या / हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा हक्क सांगता येणार नहा याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

४) ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीसीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

५) निवड केलेल्या उमेदवारांना महापालिकेने ठरवुन दिलेल्या अटि-शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच महापालिकेच्या रुग्णालयामध्ये तीनही शिप्ट मध्ये कामकाज करावे लागेल.

६) सदर उमेदवारांना महापालिकेच्या वैदयकिय विभागाअंतर्गत असणा-या रुग्णालय / दवाखान्यामध्ये / कोवीड केअर सेंटरमध्ये कामकाज करावे लागेल तथापि नेमुन दिलेल्या रुग्णालय/दवाखान्यामध्ये आवश्यकता नसलेस अन्य रुग्णालयामध्ये नियुक्ती देण्यात येईल.

७) सदरच्या नेमणुका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखुन ठेवलेले आहेत.

सही/-
(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्रमांक - 814
वैदयकिय मुख्य कार्यालय
क्र वैदय/३/कावि/२६३/२०२१
दिनांक - ०७/०४ /२०२१

(डॉ.लक्ष्मण गोफणे )
सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८